# इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना

- **उद्देश :**

केंद्र शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार राज्यातील दारिद्रय रेषेखाली नोंद असलेली ४० ते ६५ वर्षाखालील विधवा स्त्रियांना इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्र शासनाकडून रुपये २००/- प्रतिमाह देय राहील. या योजनेस पूरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून लाभार्थ्यांला रुपये ४००/- प्रतिमाह देय राहील. म्हणजेच या दोन्ही योजनेअंतर्गत लाभार्थ्यांस एकूण रुपये ६००/- प्रतिमाह निवृत्तीवेतन मिळेल.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये लाभ घेत असलेले पात्र लाभार्थी या योजनेत वर्ग करण्यात येतात.

- **पात्रतेचे अन्य निकष, अटी व शर्ती :**

वय ४० ते ६५ वयोगटातील विधवा महिला कुटुंबाचे नाव ग्रामीण /शहरी भागाच्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे.

- **लाभाचे स्वरुप :**

लाभार्थ्यास योजनेतून रुपये २००+ रुपये ४००/- संजय गांधी निराधार अनुदान योजनेतून असे एकूण रुपये ६००/- निवृत्तीवेतन दरमहा देण्यात येते.

- **आवश्यक कागदपत्रे :**

वयाचा दाखला, रहिवासी दाखला, दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा, पतीच्या मृत्यूचा दाखला,